आदर्श-गावकरी दि 17/01/2023

# चोरीमधील आरोपीला मुद्देमालासह केली अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, दोन चोरीचे गुन्हे उघडकीस

लातूर / प्रतिनिधी



गेल्या चार महिन्यांपूर्वी अनोळखी आरोपींनी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका मोटारसायकल स्वारास अडवून मारहाण करून जबरीने त्याच्याकडील मोबाईल हिसकावून घेऊन जाण्याची घटना घडली होती. त्यावरून शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी आरोपीला मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याबाबत आदेशित करून सूचना केल्या होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी (लातूर शहर) जितेंद्र जगदाळे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलावंडे यांच्या नेतृत्वात पोलीस पथक तयार करण्यात आले. या पथकाने फिर्यादीकडे विचारपूस करून त्याने सांगितलेल्या वर्णनावरून पोलीस स्टेशनच्या अभिलेखावरील व लातूर शहरालगत असलेल्या जिल्ह्यातील अनेक गुन्हेगारांची चाचपणी करण्यात येत होती. दरम्यान रविवारी (दि.१५) पोलीस पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्लेषण करून ही माहिती वरिष्ठांना कळवून आरोपी अंकुश तानाजी जाधव (२१, रा.कोल्हे नगर लातूर) यास त्याच्या ठिकाणाहून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने चार महिन्यांपूर्वी लातूर शहरात एका मोटारसायकल स्वारास मारहाण करून त्याचे आणखीन दोन साथीदार सुशील रमेश कांबळे (रा.कोल्हे नगर लातूर), विश्वजीत अभिमन्यू देवकते (रा. कापूर ता.जि. लातूर) या तिघांनी मिळून जबरीने लुटले, असे कबूल करून ताब्यातील आरोपी अंकुश जाधव याने गुन्ह्यात चोरलेला मोबाईल आणि गुन्हे करताना वापरलेली ज्युपिटर गाडी असा एकूण ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

त्यावरून आरोपी अंकुश जाधव यास मुद्देमालसह ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास शिवाजीनगरचे पोलीस करत आहेत. गुन्ह्यातील इतर दोन आरोपी आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात सहाय्यक फौजदार संजय भोसले, पोलीस अंमलदार अंगद कोतवाड, राम गवारे, माधव बिलापट्टे, राजेश कंचे, राजू मस्के, जमीर शेख, सुधीर कोळसुरे, सिद्धेश्वर जाधव, मोहन सुरवसे, योगेश गायकवाड, प्रदीप चोपणे, नकुल पाटील यांनी केली आहे.